# कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि; कोल्हापूर

संपूर्ण महाराष्ट्र राज्य कार्यक्षेत्र व १५०० कोटी + व्यवसाय असलेल्या व संपूर्ण CBS वापरात असलेल्या सांगली अर्बन को-ऑप. बँक लि., सांगली (शेड्युल्ड बँक) मध्ये आपले करिअर घडवू इच्छिणाऱ्या पदवीधारकांकडून क्लार्क पदाकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

## *पात्रता *

१) वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी बी.सी.एस., बी.सी.ए., एम.सी.ए., बी.बी.ए., एम.बी.ए. या शाखेत कमीत कमी ५५% गुणासह पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.

२) MS-CIT / समतुल्य प्रमाणपत्र अभ्यासक्रम असणे आवश्यक.

३) प्राधान्य – JAIIB / GDC&A / सहकार विषयक पदवी असल्यास तसेच इतर बँकेतील कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य.

४) नोकरीचे ठिकाण बँकेचे कार्यक्षेत्र असलेल्या शाखांमध्ये.

५) वयोमर्यादा : कमाल २५ वर्षे (जन्म - ०१.०१.१९९८ नंतर आवश्यक)

**६) उमेदवार हे सांगली जिल्ह्यातील स्थानिक असणे आवश्यक.**

७) संकेत स्थळावरील नमुना अर्जाप्रमाणे ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावयाचा आहे.

## *अन्य माहिती*

१) भरती पदसंख्या - ४०

२) सुरवातीस द्यावयाचा पगार – **१००००/-**

## *अर्ज करण्याची पद्धत व निवड प्रक्रिया*

१) उमेदवाराने प्रथम सर्व सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात, त्यानंतर अर्ज व बायोडाटा पाठवावा.

२) महाराष्ट्र शासन सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचेकडील दिनांक २१ /०१/२०१९, दि. २९/११/२०२१ सहकार आयुक्त यांचेकडील दि. २४/०३/२०२२ व १४/०६/२०२२ रोजीचे आदेशान्वये सहकारी बँकांतील नोकरभरती प्राक्रिया शासन नियुक्त संस्थेद्वारेच करणे बंधनकारक आहे.

३) त्यानुसार भरती प्रक्रिया सहकार आयुक्तांचे पॅनेलवरील कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि; कोल्हापूर यांचेमार्फत राबविली जाणार आहे.

४) उमेदवारांनी विहित नमुन्यात अर्ज (बायोडाटा) **kopbankassorecruit@gmail.com** या ईमेलवर पाठवावेत. सोबत शैक्षणिक व अन्य कागदपात्रांची आवश्यकता नाही. अर्जासोबत कोणतीही कागदपत्रे स्कॅन करून पाठवू नयेत. कागदपत्राची पाहणी प्रत्यक्ष मुलाखतीच्यावेळी केली जाईल.

५) परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेणेत येईल.

६) परीक्षा १०० मार्कांची व बहुपर्यायी असणार आहे. पासिंगसाठी किमान ६० मार्क मिळवणे आवश्यक आहे. तथापी गुणवत्ता यादी (कट ऑफ) ठरविणेचे अधिकार बँकेस राहतील. बँकेने ठरविलेल्या गुणवत्ता यादी (कट ऑफ) नुसार उमेदवारांची यादी केली जाईल व सदर यादी प्रमाणे मुलाखतीस बोलवले जाईल.

७) परीक्षेचे स्वरूप व अभ्यासक्रम साधारण IBPS च्या धरतीवर आधारित आहे. परीक्षेचा नमुना पेपर सोबत जोडला आहे. परीक्षेची तारीख, वेळ, ठिकाण व परीक्षेचे ब्रॉशर उमेदवारास त्याच्या ईमेल आयडीवर पाठविले जाईल. सबब ईमेल आयडी पाठविताना अचूक पाठवावा. सदर परीक्षेचे आयोजन कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि; कोल्हापूर यांचे मार्फत संगणक सुविधा असणाऱ्या योग्य अशा ठिकाणी केले जाणार आहे. परीक्षेचे स्थळ नियोजित तारखेपूर्वी उमेदवारांना कळविले जाईल.

८) तोंडी मुलाखतीचे आयोजन बँकेमार्फत केले जाईल.

९) ऑनलाईन परीक्षेच्या निकालाची यादी असोसिएशनच्या वेबसाईटवर प्रसिध्द केली जाईल.

१०) परीक्षेसाठी **रु. १०००/- (जीएसटीसह)** या प्रमाणे परीक्षा शुल्क (विना परतीची) आकारले जाणार आहे. उमेदवाराने **परीक्षा शुल्क रु. १०००/- स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेच्या Timber Market, Kolhapur शाखा IFSC CODE : SBIN0005550, MICR Code : 416002008 वर कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स सहकारी असोसिएशन लि; यांचे चालू खाते (Current A/C) क्र.**

**४०१६८२०८०५७** मध्ये NEFT / RTGS ने अर्जासोबत पाठवावे. परीक्षा शुल्क भरले बाबतचे UTR नंबर / स्क्रीन शॉट अर्जात नमूद करणे, पावती जोडणे आवश्यक आहे.

११) परीक्षा शुल्क जमा केल्याशिवाय अर्ज स्विकारला जाणार नाही. मागणीनुसार परीक्षा शुल्क न भरल्यास उमेदवारास परीक्षेस बोलविले जाणार नाही.

१२) मुलाखतीमध्ये योग्य ठरणाऱ्या उमेदवारांची बँकेच्या आवश्यकतेनुसार नेमणूक केली जाईल. याबाबतचे सर्व अधिकार मा. संचालक मंडळाकडे राहतील.

१३) अर्ज करण्याची शेवटची तारीख २७/०२/२०२३ रोजी सांयकाळी ६ वाजेपर्यंत राहील.

१४) या संदर्भात अन्य कोणत्याही खुलाशासाठी बँकेच्या कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते संध्याकाळी ५ या वेळेत असोसिएशन दूरध्वनी क्र. **०२३१-२६२७३०७ / ०८** किंवा असोसिएशनचा मोबाईल क्रमांक **८३८००३३१२८** वर संपर्क करावा.

१५) भरती प्रक्रीये संदर्भातील पुढील अपडेट मिळवणेसाठी वेळोवेळी असोसिएशनच्या वेबसाईटला भेट द्या.

१४५८ बी वॉर्ड, जी.एन.चेंबर्स, कोळेकर तिकटी, मंगळवार पेठ, कोल्हापूर – ४१६०१२
फोन नं. (०२३१) २६२७३०७/०८, ई-मेल : kopbankasso@gmail.com वेबसाईट : kopbankasso.com